भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ६८१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०१/१०/२०१७

**१) अश्लिल शब्दात शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ३०/०९/२०१७ चे १०.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हे गावचे पोलीस पाटील असल्याने, नहरावर आंघोळ करणाऱ्या लोकांना नहरात वाहुन जाल, तुम्ही बाहेर निघा अशी समज दिली असता ,यातील आरोपीने फिर्यादीस अश्लिल शब्दात शिवीगाळ करून, जिवाने मारण्याची धमकी दिल्याने, फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम २९४,५०४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. खंडाते पो.स्टे लाखांदुर हे करीत आहेत.

**२) अश्लिल शब्दात शिवीगाळ करून पाहुन घेण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक ३०/०९/२०१७ चे १९.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा त्याचे साक्षदारासह आरोपीचे घरा समोर रोडवर जावुन आरोपीला, 'तुने माझ्या मागे माझ्या पत्नीला काय शिवीगाळ केली' असे म्हणुन विचारले असता, यातील अरोपीने फिर्यादी सोबत भांडण करून फिर्यादीच्या पत्नी विषयी अश्लिल शब्दात शिवीगाळ करून पाहुन घेण्याची धमकी दिल्याने, फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २९४,५०६,५०९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. चुटे पो.स्टे पवनी हे करीत आहेत.

**३) संगनमत करून डोक्यावर काठीने मारून गंभिर जखमी केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २९/०९/२०१७ चे २०.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी तेजराम अंबदास वाघमारे वय ३५ वर्ष रा. पाहाडी हा रोडाने त्याचे घरी जात असतांना, यातील आरोपी क्र. १ ने फिर्यादीस जेवन कर असे बोलुन, शिवीगाळ करून ओढतान केली असता, आरोपीतांनी संगनमत करून, फिर्यादीस डोक्यावर काठीने व बुक्यानी मारपीट करून गंभिर जखमी केल्याने, फिर्यादी जखमीचे बयान व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ३२६,५०४,१४१,१४३,१४७,१४८,१४९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. सुनगार पो.स्टे पालांदुर हे करीत आहेत.आरोपी अटक आहे.

**४) क्षुल्लक कारणा वरून भांडण करून काठीने मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २९/०९/२०१७ चे २०.०० वाजता दरम्यान यातील आरोपीने फिर्यादीस जेवन करण्याचे कारणा वरून शिवीगाळ करून 'तु जास्त बोलु नको असे बोलुन ' भांडण करून काठीने डावे हातावर, डावे पायावर मारून जखमी केल्याने फिर्यादी जखमी अशोक पाडुरंग मेश्राम वय ४५ वर्ष रा. पाहाडी यांचे बयान व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ३२४,५०४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. शेंडे पो.स्टे पालांदुर हे करीत आहेत.

**५) ट्रकच्या धडकेत कार चालक जखमी . :—**

दिनांक ३०/०९/२०१७ चे १९.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा त्याचे कार क्र. एमएच ३१ सी. टी. ६९०१ ने भंडारा कडुन लाखनी कडे जात असता, यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक हयगयीने, निष्काळजीपने चालवुन फिर्यादीचे कारला मागेहुन धडक देवुन कारमधील पुष्पा अशोक डोरले वय ४५ वर्ष रा. गणेशपुर भंडारा हिला जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी विष्णु क्रिष्णा साठवणे वय ३५ वर्ष रा. पिंकेपार कोरंभी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३३७ भांदवि. सहकलम १८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. नवखरे पो.स्टे कारधा हे करीत आहेत.

**६) मोटार पंपची चोरी . :—**

दिनांक २७/०९/२०१७ चे २०.०० ते दि. २८/०९/२०२७ चे ०६.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी बाळाभाऊ बालकदास खोब्रागडे वय ३३ वर्ष रा. दवडीपार यांचे शेतातील धान पिकासाठी पाणी देण्या करीता शेतातुन गेलेल्या नाल्यावर लावलेली, सी.आर.आय.एफ. कंपीनीची मोटार पंप १.५ एचपी कि. ८,५००/रु ची कोणीतरी अज्ञात चोराने कुनीही नसल्याची संधी साधुन, चोरुन नेल्याने ,फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बाहादुरे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**७) अवैध दारू अडयावर धाडी . :—**

दिनांक ३०/०९/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन तुमसर,सिहोरा,लाखनी, आंधळगाव व लाखांदुर, येथे अवैध दारू अडयावर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून ४५ लिटर हा.भ. दारू किंमती २,५५०/—रु, व ३६८ लिटर १० मिली लिटर ८० मिलीलीटर देशी दारू किंमती ३,४०५ /—रु. असा एकुण किंमती ५,९५५/—रु. चा माल जप्त करण्यात आला.

**८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक ३०/०९/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ३६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०२, तीन सिटर वाहनांवरती ०१ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ३३ केसेस करण्यात आले आहे.

PSI

**( मपोउपनी प्रणती लांजेवार)**

**महीती कक्ष अधीकारी भंडारा**

**दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२**

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.